12-04-2025-Dai-03final_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/11/2025 10:46 PM Page 1

निवडक

म्हापशात सूपरमार्केटला आग

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ११ : येथील अलंकार थिएटरजवळील इमारतीत असलेल्या 'वी केअर २४/७' सुपर मार्केटला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास ही आग लागली. या आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आग मार्केटच्या मागील बाजूकडून पसरली. सुरुवातीला दुकानातील कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र ती भडकली आणि संपूर्ण मालाला लागली. या आगीत किराणा, सौंदर्य प्रसाधने, शीतपेय, स्टेशनरी, संगणक, वातानुकूलित यंत्रणा जळाली. दुकानाबाहेर पार्क केलेल्या दुचाकीलाही आगीची झळ पोहोचली. सुमारे ६० लाखांचा माल विक्रीस ठेवण्यात आला होता, यातील बहुतांश माल जळून खाक झाला आहे. म्हापसा अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. मात्र, या आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पार्से : उपसरपंचपदी निवडलेल्या प्रज्ञा पार्सेकर. सोबत सरपंच अजय कलंगुटकर, माजी आमदार दयानंद सोपटे, रेश्मा कांबळी व मधुसूदन सातार्डेकर.

पार्से पंचायतीच्या उपसरपंचपदी प्रज्ञा पार्सेकर यांची निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ११ : मांद्रे मतदारसंघातील पार्से पंचायतीच्या उपसरपंचपदी प्रज्ञा सुभाष पार्सेकर यांची शुक्रवारी निवड करण्यात आली. निवडीवेळी सरपंच अजय कलंगुटकर, उपसरपंच प्रज्ञा पार्सेकर, माजी उपसरपंच व विद्यमान पंच रेश्मा कांबळी व मधुसूदन सातार्डेकर उपस्थित होते. निवडीबद्दल सरपंच अजय कलंगुटकर व समर्थक पंच व माजी आमदार दयानंद सोपटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.राज्यात भाजपचे सरकार असून,पक्षाचा पदाधिकारी असल्याने, जी कामे प्रलंबित व करावयाची असल्यास अवश्य मदत करू,असे आश्वासन माजी आमदार सोपटे यांनी दिले. यापूर्वी मतदारसंघात ,अनुसूचित जातीचे चोपडे पंचायत क्षेत्रत नितीन चोपडेकर हे निवडून आले होते. आगामी काळात सरपंच व अन्य पंचांनी मिळून गावचा सर्वांगीण विकास करून आदर्श गाव निर्माण करण्याचे ध्येय बाळगावे, असे आवाहन माजी आमदार दयानंद सोपटे यांनी केले.

मुळगाव ग्रामपंचायतीची २० रोजी सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ११ : मुळगाव ग्रामपंचायतीची सर्वसाधारण ग्रामसभा रविवार, दि. २० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित केली आहे. या ग्रामसभेसमोर कोणत्याही सदस्याला त्याचा/ तिचा प्रस्ताव/ ठराव सादर करायचा असेल तर त्यांनी बुधवार दि. १६ पर्यंत सरपंच किंवा उपसरपंच यांच्याकडे लेखी स्वरूपात द्यावा. या ग्रामसभेत विविध सरकारी योजनांसाठी लाभार्थीकडून आलेल्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे, सन २०२५-२०२६ सालच्या अंदाज पत्रकास मंजुरी देण्याबाबत, सन २०२४ - २०२५ सालच्या सुधारित अंदाज पत्रकास मंजुरी देण्याबाबत, सन २०२४ - २०२५ सालच्या जमाखर्चाचे वाचन, सन २०२४ - २०२५ सालच्या प्रशासकिय अहवालास मंजुरी देण्याबाबत, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत करावयाच्या कामासंबंधी चर्चा करणे, जैव विविधता व्यवस्थापन समितीचा कार्य अहवाल सादर करणे, मतदारांकडून आलेल्या विकास कामांच्या पत्रावर/ ठरावांच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे आदींवर चर्चा करण्यात येणार आहे, असे सरपंच मानसी कवठणकर यांनी कळविले आहे.

सरस्वती विद्यालयाचे १५पासून उन्हाळी शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. ११ : कवळे येथील श्री सरस्वती पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातर्फे ४ ते ८ वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिर मंगळवार दि. १५ ते २५ एप्रिलपर्यंत सकाळी ९ ते १२ यावेळेत कवळे येथील श्री सरस्वती विद्यालयाच्या सभागृहात घेण्यात येईल. या शिबिरात संगीत, कथाकथन, गाणी, खेळ, क्राफ्ट, चित्रकला, शुद्धलेखनाचे नियम, घोषणा इत्यादी उपक्रम घेण्यात येतील. या शिबिरासाठी १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार असून इच्छुकांनी आपली नावनोंदणी १४ एप्रिलपर्यंत माधवी कपिलेश्वरकर यांच्याकडे करावी.

कुर्टी-फोंडा नाला कचऱ्याच्या विळख्यात

स्थानिकांचा संताप : आरोग्यास बनला धोकादायक: त्वरित स्वच्छता मोहीम राबविण्याची गरज

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ११ : एकेकाळी स्वच्छ आणि जीवनदायिनी असलेला कुर्टी येथील नाला आज कचरा आणि गाळाच्या विळख्यात सापडला असून, दुर्गंधीयुक्त आणि आरोग्यास धोकादायक नाला म्हणून या नाल्याची ओळख झाली आहे . स्थानिक नागरिकांनी या परिस्थितीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

दोन दशकांपूर्वी हा नाला फक्त आंघोळ आणि कपडे धुण्यासाठीच नव्हे, तर शेतीसाठी महत्त्वाचा जलस्रोत होता. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे आणि बेफिकीर कचरा व्यवस्थापनामुळे त्याचे कचराकुंडीत रूपांतर झाले आहे. औद्योगिक कचऱ्यासह घरगुती आणि हॉटेलमधील टाकाऊ पदार्थ येथे मोठ्या प्रमाणावर फेकले जात आहेत. विशेषतः, मृत प्राण्यांचे शव आणि मांसाहारी कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

हा नाला बेतोडा औद्योगिक वसाहतीतून उगम पावतो आणि कुर्टी खांडेपार पंचायतीमार्गे फोंडा शहरात प्रवेश करतो. पुढे कवळे आणि बांदोडा भागातून वाहत जाऊन तो शेवटी झुआरी नदीत विलीन होतो. परंतु, या प्रवासात नाल्यात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण मिसळत असल्याने त्याचे स्वरूप संपूर्णतः बदलले आहे.

स्थानिक रहिवासी महेश पणशीकर यांच्या मते, फोंड्याच्या मुख्य नाल्यात अनेक अंतर्गत झरे मिसळतात, त्यामुळे वर्षभर येथे पाण्याचा प्रवाह असतो. मात्र, बेतोडा औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमधून प्रक्रिया न केलेला रासायनिक कचरा नाल्यात सोडला जातो, त्यामुळे प्रदूषणाची सुरुवात होते. त्यानंतर, कुर्टी परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे घरगुती आणि प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे.

फोंडा शहरातही परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, बाजारपेठेतील विक्रेते थेट नाल्यात कचरा टाकत आहेत. परिणामी, नाल्यात काळसर-हिरवट दूषित पाणी वाहत असून, संपूर्ण परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे.

पूर्वी या नाल्यातील पाणी शेतीसाठी वापरण्यात येत होते. मात्र, सध्या या प्रदूषित पाण्याचा शेतीसाठी वापर केल्यास शारीरिक त्रास, त्वचेच्या समस्या आणि अन्य आरोग्यविषयक धोके निर्माण होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती करण्यास नकार दिला असून, काहींनी आपली जमीन पडीक ठेवण्यास सुरुवात केली आहे.

नाल्याची सध्याची दयनीय अवस्था पाहता, स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे त्वरित स्वच्छता मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. या नाल्यातील पाणी नीट व्यवस्थापित केल्यास, ते शेती, बागकाम, बांधकाम आणि औद्योगिक उपयोगासाठी उपयुक्त ठरू शकते. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी स्थानिकांची मागणी आहे.

उसगाव पीडीए मार्केटमध्ये अतिक्रमण

▶ न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली : पंचायत नियंत्रण ठेवण्यात अपयशी

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ११ : न्यायालयाने अलीकडेच मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याचे स्पष्ट निर्देश दिले असले तरी, उसगाव पीडीए मार्केटमधील विक्रेत्यांकडून या आदेशाची सर्रासपणे पायमल्ली होत आहे. रस्त्यावरील अतिक्रमणामुळे स्थानिक रहिवासी तसेच वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीवर पंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) असहाय्य असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

स्थानिक रहिवाशांनी न्यायालयाच्या आदेशानुसार अतिक्रमणविरोधी कारवाई त्वरित राबविण्याची मागणी केली आहे. पंचायत आणि पीडब्ल्यूडीच्या संयुक्त पथकाने या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरून संभाव्य अपघात आणि वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, अशी स्थानिकांची अपेक्षा आहे.

पीडीए मार्केटमधील विक्रेते संध्याकाळी उशिरा रस्त्यावर उतरतात आणि भाजीपाला तसेच मासे विक्रीसाठी मुख्य रस्त्याचा वापर करतात. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर गोंधळ उडतो. परिणामी वाहतूक कोंडी, चोरी आणि अपघातांची शक्यता वाढते.

उसगाव गांजेचे सरपंच रामनाथ डांगी यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, अतिक्रमणाची माहिती वाहतूक शाखेला देण्यात आली असून, त्वरित कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. विक्रेत्यांच्या या मनमानीमुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रशासनाने त्वरित लक्ष घालून रस्ता मोकळा करावा.

याशिवाय, पीडीए मार्केटच्या जुन्या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव देखील तयार करण्यात आला असून, लवकरच तेथे नवीन बाजारपेठ उभारण्याची योजना आहे, असे सरपंच डांगी यांनी सांगितले. स्थानिक प्रशासनाने या समस्येची दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

मोपा विमानतळावर भाडे मारणाऱ्या रेन्ट अ कारधारकांवर कारवाई करा

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ मोपा टॅक्सी व्यावसायिकांची मागणी : पेडणे वाहतूक विभाग, उपअधिक्षकांना निवेदन सादर

पेडणे, दि. ११ : रेन्ट अ कार व्यावसायिकांनी मोपा टॅक्सी व्यावसायिक निखिल महाले यांच्या विरोधात दिलेली तक्रार ही बोगस असून ती सिद्ध करावी, अशी मागणी मोपा टॅक्सी व्यावसायिकांनी शुक्रवारी केली. तसेच यापुढे रेन्ट अ कारद्वारे कोणत्याच प्रकारचे भाडे मोपा विमानतळावरून मारू नयेत. यावर सरकारने लक्ष देऊन जे रेन्ट कार व्यावसायिक भाडे मारतात, त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करत मोपा टॅक्सी व्यावसायिकांनी पेडणे वाहतूक विभाग, पेडणे तालुका पोलिस उपाधीक्षक आणि मोपा विमानतळ पोलिस ठाण्यात निवेदन दिले.

मोपा विमानतळावर बेकायदेशीर रेन्ट कार व्यावसायिक भाडे मारत होते. त्यासंदर्भात दोन्ही गटांमध्ये वाद झाल्यानंतर निखिल महाले यांच्याविरोधात रेन्ट कार व्यावसायिकांनी तक्रार नोंदवली. त्यानंतर टॅक्सी संघटनांनी मोपा विमानतळ पोलिस स्टेशन, पेडणे तालुका पोलिस उपअधीक्षक आशिष शिरोडकर यांची भेट घेऊन आपली समस्या मांडली. जे टॅक्सी व्यावसायिक रेन्ट कारद्वारे मोपा विमानतळावर भाडे मारतात, त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली.

निखिल महाले यांनी सांगितले की, मोपा विमानतळावर रेन्ट कारद्वारे बेकायदेशीरपणे व्यवसाय सुरू आहे. त्या संदर्भात आम्ही जाब विचारला, तर आमच्याच विरोधात खोट्या तक्रारी नोंदवल्या जातात. त्यात तक्रारीत जर तथ्य असेल तर पोलिसांनी कसून चौकशी करावी. विमानतळासाठी ज्यांच्या जमिनी गेल्या, त्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला. आमच्याही भरपूर जमिनी गेलेल्या आहेत. परंतु आम्हाला अजून सरकारी नोकऱ्या मिळाल्या नाही. आम्ही टॅक्सी व्यवसाय करतो आणि आम्ही आवाज केल्यानंतर आमच्या विरोधात खोट्या तक्रारी नोंदवल्या जातात. यापुढे आम्ही गप्प बसणार नाही. असा इशारा यावेळी निखिल महाले आणि उपस्थित शिव वॉरियस युनायटेड टॅक्सी ब्रदर व्यावसायिकांनी दिला.

मोपा टॅक्सी व्यावसायिकांचा प्रश्न अजूनपर्यंत सुटलेला नाही. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यात लक्ष घालून हा विषय कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी महाले यांनी यावेळी केली.

मोपा विमानतळावर रेन्ट अ कार येऊ नये, असा आदेश वाहतूक संचालकांनी दिला आहे. परंतु कलंगुट भागातील रेंट अ कार व्यावसायिकांनी आमच्या विरोधात वेगवेगळे व्हिडिओ व्हायरल करून आम्ही मोपा विमानतळावर पर्यटकांना प्रवाशांना त्रास करतो. अशा पद्धतीचा जो खोटा दावा केलेला आहे, तो साफ चुकीचा आहे. आम्ही रेन्ट अ कारला मोपा विमानतळावर बंदी आणलेली नसून ती सरकारने वाहतुकीच्या नियमानुसार आणल्याचा दावा वारंग यांनी केला.

अन्यथा स्थानिकांना रेंट अ कारला परवानगी द्या

मोपा विमानतळावर जर रेन्ट अ कार व्यावसायिकांना भाडे मारण्याची परवानगी द्यायची असेल तर सरकारने जे स्थानिक मोपा विमानतळावर २०० पेक्षा टॅक्सीव्यावसायिक आहेत, त्या सर्व टॅक्सी व्यावसायिकांना रेट अ कॅब कार व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी. त्यांना परवाने द्यावेत, अशी जोरदार मागणी यावेळी संघटनेने केली. किनारी भागात पर्यटन हंगामात जो व्यवसाय रेट अ कार व्यावसायिकांना सरकारने करून दिलेला आहे, तो व्यवसाय त्यांनी करावा. परंतु, विमानतळावर अशाप्रकारे व्यवसाय करू नये, असा इशाराही यावेळी टॅक्सी व्यवसायिकांनी दिला.

अटाला प्रकरण: घरमालकाविरोधात कारवाई सुरू

▶ भाडेकरूची माहिती पोलिसांनी न दिल्याने गुन्हा दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ११ : इस्रायली ड्रग माफिया यानिव्ह बेनाई ऊर्फ अटाला याला ८.७ लाख रुपयांच्या अमली पदार्थांसह अटक केल्यानंतर, त्याला भाड्याने घर दिलेल्या घरमालकाविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. परदेशी नागरिकाला भाडेकरू म्हणून घेतल्याची माहिती स्थानिक पोलिसांना न दिल्याने संबंधित घरमालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथक (एएनसी)चे उपअधीक्षक नेरलॉन अल्बुकर्क यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवोली येथील ३६ वर्षीय परम वर्ती यांनी अटाला याला स्टुडिओ अपार्टमेंट भाड्याने दिले होते. मात्र, त्यांनी हणजूण पोलिस ठाण्यात परदेशी नागरिकाच्या वास्तव्याबाबत 'सी' फॉर्म भरला नव्हता. यामुळे पोलिसांनी त्यांच्या विरोधात अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

पोलिस उपअधीक्षक अल्बुकर्क यांनी स्पष्ट केले की, हॉटेल आणि गेस्ट हाऊस चालकांसह भाडेकरूंना घर देणाऱ्या मालकांनी परदेशी नागरिकांच्या तपशीलाची माहिती स्थानिक पोलिसांना 'सी' फॉर्मद्वारे देणे बंधनकारक आहे. मात्र, वर्ती यांनी या प्रक्रियेत हलगर्जीपणा केला. कोणत्याही व्यक्तीकडे आधार कार्ड, पासपोर्ट किंवा अन्य ओळखपत्र असले तरी, जर तो परदेशी नागरिक असेल, तर त्याच्या वास्तव्याची नोंद स्थानिक पोलिस ठाण्यात असणे आवश्यक आहे, असे अल्बुकर्क यांनी स्पष्ट केले.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, वर्ती यांनी मूळ मालकांकडून १९ स्टुडिओ अपार्टमेंट भाड्याने घेतली होती आणि ती पर्यटकांना रजा व परवाना करारद्वारे भाड्याने देत होते. त्यांच्यावर फॉरेनर्स ऑर्डर १९४८ च्या कलम १६ आणि फॉरेनर्स कायदा १९४६ च्या कलम १४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत दोषी ठरल्यास त्यांना दंड आणि पाच वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.

गोव्यात रजा व परवाना करार हा मालकी हक्क न देता, विशिष्ट कालावधीसाठी मालमत्तेच्या तात्पुरत्या हस्तांतरणासाठी वापरला जातो. याचा उपयोग प्रामुख्याने निवासी आणि व्यावसायिक भाडेकरूंसाठी केला जातो. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीयकृत बँकेत आधार कार्ड मिळवण्यासाठी एएनसी अधिकाऱ्यांनी अटालाने सादर केलेली कागदपत्रे तपासण्याचा प्रयत्न केला. मात्र, महाराष्ट्रात सुट्टी असल्याने यूआयडीएआय मुख्यालयाकडून आवश्यक कागदपत्रे अद्याप पोलिसांच्या हाती आलेली नाहीत.

गेल्या १५ वर्षांपूर्वी अटालाच्या अटकेनंतर पोलिस-राजकारणी-ड्रग माफिया संबंधांचे धागेदोरे उघड झाले होते. त्यानंतर सात पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. शनिवारी (६ एप्रिल) पहाटे अंमली पदार्थ विरोधी पथकाने (एएनसी) अटालाला ८.७ लाख रुपयांच्या ड्रग्जसह अटक केली. या घटनेने पुन्हा एकदा गोव्यातील ड्रग माफियांच्या नेटवर्कवर प्रकाश टाकला आहे.

हरमल किनाऱ्यावरील स्विमिंग झोनमध्ये अखेर बदल

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ११ : पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या हरमल समुद्रकिनाऱ्यावर पर्यटन खात्याने सुरक्षित स्विमिंग झोन आरक्षित केला होता. मात्र, त्याला मच्छिमार बांधवांनी हरकत घेतली. याबाबतची कल्पना मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांना भेटून दिल्यानंतर त्यांनी लगेचच याकडे लक्ष घालून आरक्षित केलेला झोन हटविण्यास संबंधितांना भाग पाडले.झोन हटविल्याबद्दल आमदार आरोलकर यांचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच सांतान फर्नांडिस यांनी आभार मानले आहेत.

गेली अनेक वर्षे या किनारी भागात हिंदू ख्रिस्ती बांधवांच्या रापणी आहेत. मोठ्या होड्याच्या साहाय्याने खोल समुद्रात मासेमारी करणे व त्याच्या मिळकतीतून चरितार्थ चालवित आहेत. परंतु, स्विमिंग झोन केला असता मच्छिमार बांधवांच्या अडचणी वाढल्या असत्या. या समुद्रकिनारी सद्या अनेक पर्यटक निरनिराळ्या भागात स्नान घेताना दिसून येतात, मात्र ज्या पट्ट्यात मासेमारीच्या होड्या उतरत असतात, त्याच भागात स्विमिंग झोन केल्याने मच्छिमारांची आयुधे व अन्य सामान ठेवण्यास कठीण झाले असते, असे मच्छिमार फर्नांडिस यांनी सांगितले.

याबाबतची तक्रार मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांच्या कानी घातली होती. मच्छिमार बांधवांच्या समस्या लक्षात घेऊन आमदार जीत आरोलकर यांनी सबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून स्विमिंग झोन बदलास मान्यता दिली व त्यानंतर झोन दर्शविणारे प्लास्टिक साहित्य हटविण्यात आल्याचे पंच फर्नांडिस यांनी सांगितले. त्याबद्दल या भागातील मच्छिमार बांधवांनी आमदार जीत आरोलकर यांचे आभार मानले आहेत.

विमानतळाचा महसूल कोट्यवधींमध्ये; प्रकल्पग्रस्त मात्र उपेक्षित

भाडेपट्टा हक्क असूनही अनेकजण आर्थिक मोबदल्याविना : सरकारकडून अन्याय झाल्याचा ग्रामस्थांचा आरोप

ऑगस्टो रॉड्रिग्ज / टीम हेराल्ड

पेडणे , दि. ११ : डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या तीन महिन्यांत मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळातून गोवा सरकारने ३१.५१ कोटी रुपयांचा महसूल मिळवला. मात्र, विमानतळाच्या शेजारील वारखंड-नागझर येथील स्थानिक ग्रामस्थांनी सरकारवर अन्यायाचा आरोप करत, त्यांच्या हक्कांचा योग्य मोबदला मिळालेला नसल्याची तक्रार केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, विमानतळ प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीसाठी त्यांना अपेक्षित मोबदला मिळालेला नाही. एका रहिवाशाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, मी अनेक ठिकाणी अर्ज केला, दरवाजे ठोठावले, पण आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. दशरथ विठ्ठल आरोस्कर यांच्यासह अनेक रहिवासी सुरुवातीला विमानतळामुळे आशावादी होते. मात्र, त्यांचा दावा आहे की सर्वेक्षण क्रमांक ८४ आणि ७६ अंतर्गत असलेल्या जमिनीवरील भाडेपट्टा हक्क असूनही त्यांना कोणताही आर्थिक मोबदला मिळालेला नाही. भाडेकरूंना अर्धा मोबदला मिळायला हवा, तर उर्वरित हिस्सा घरमालकांना मिळायला हवा. मात्र, आम्हाला काहीच मिळाले नाही, असे आरोस्कर यांनी सांगितले. त्यांच्या या भूमिकेला गावातील इतर लोकांनीही समर्थन दिले.

स्थानिक रहिवासी म्हणतात की, त्यांच्यावर कायदेशीर बाबतीत दिशाभूल केली गेली. आमच्या वतीने खटला दाखल केला जाईल असे सांगण्यात आले, पण नंतर समजले की आम्ही सर्वोच्च न्यायालयात हरलो. प्रत्यक्षात काय घडले हे आम्हाला समजलेच नाही, असे एका स्थानिकांनी सांगितले. विमानतळामुळे परिसरातील दळणवळण सुधारले असून, व्यावसायिक गतिविधींमध्ये वाढ झाली आहे. नवीन दारू दुकाने आणि होम-स्टे मोठ्या प्रमाणावर वाढली असली, तरी स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, त्यांना यातून फारसा फायदा झालेला नाही. आमच्या लोकांना ना पैसे मिळाले, ना नोकऱ्या. माझा सुशिक्षित मुलगा रोजगारासाठी वणवण भटकून आता घरी बसला आहे, असे एका रहिवाशाने सांगितले.

गावातील काही भागात सुपारीची झाडे आणि घरे हटवली जाणार असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. इतक्या तुटलेल्या आश्वासनांनंतर आम्ही फक्त प्रार्थना करू शकतो, असे उल्हास नाईक यांनी सांगितले. विमानतळामुळे परिसरातील शिक्षण व्यवस्थेवरही परिणाम झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आमच्या गावातील मोठी शाळा बंद झाली आहे. मुलांना आता शिक्षणासाठी पेडणेला जावे लागते, असे कांता परब यांनी सांगितले.

वारखंड-नागझरच्या सरपंच गौरी गोविंद जोसाळकर यांनी ग्रामस्थांच्या तक्रारींना दुजोरा दिला. पंचायत मदत करण्याचा प्रयत्न करत आहे, पण आमच्या अधिकारांमध्ये मर्यादा आहेत. सरकारने ठरवलेले जमिनीचे दर खूपच कमी आहेत. स्थानिकांच्या आर्थिक स्थितीचा गैरफायदा घेतला जात आहे,असे त्यांनी सांगितले.स्थानिक तरुण अमित आरोसकर यांनी रोजगाराच्या संधींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नोकरी मिळवण्यासाठी राजकीय किंवा व्यावसायिक संबंध आवश्यक आहेत. विमानतळ आमच्यासाठी गरिबीतून बाहेर पडण्याचा मार्ग असायला हवा होता, मात्र आता आम्हाला कोणतीही मदत मिळत नसल्याची भावना आहे, असे त्यांनी सांगितले.